# व्हिडीओ प्रकरणाची महिला आयोगाकडून दखल

## वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची सूचना : विधान परिषदेत तीव्र प्रतिक्रिया, सदस्यांनी व्यक्त केला संताप

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** किरीट सोमय्या व्हिडीओ प्रकरणात आता राज्य महिला आयोगही आक्रमक झाला आहे. सोमय्या यांच्या व्हिडीओ प्रकरणाची लवकरात लवकर चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची सूचना राज्य महिला आयोगाने मुंबई पोलिसांना केली आहे.

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी सांगितले की, सोमय्या यांचा आक्षेपार्ह अवस्थेतील व्हिडीओ प्रसारित झाल्यानंतर अनेक सामाजिक संस्थांनी महिला आयोगाकडे यासंदर्भात विचारणा केली. त्यानंतर महिला आयोगाकडून मुंबईच्या पोलिस आयुक्तांना पत्र पाठविण्यात आले आहे. या प्रकरणाची लवकरात लवकर चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याच्या सूचना महिला आयोगाकडून पोलिसांना देण्यात आल्या आहेत.

आतापर्यंत महिला आयोग संबंधित महिलांनी तक्रार केल्यास आधारे कारवाई करतो. काही प्रकरणांमध्ये स्युमोटो तत्त्वावर कारवाई केली जाते. त्यामुळे आता मुंबई पोलिसांचा अहवाल आल्यानंतर पुढे काय करायचे, याचा निर्णय घेतला जाईल, असे चाकणकर यांनी सांगितले.

ती महिला कोण आहे हे कळलेच पाहिजे. आम्हाला जी माहिती मिळाली ती खरी खोटी तपासून पहावी, अशी मागणी परब यांनी सभागृहात केली.

### 'त्या'ने अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त केली : अनिल परब

- या चर्चेदरम्यान अनिल परब म्हणाले, विधानसभेत गेल्या काही वर्षांत बरेच पेनड्राइव्ह बॉम्ब फुटले. आज हा पेनड्राइव्ह बॉम्ब विधान परिषदेत आला आहे. एका वृत्तवाहिनीवर भाजपच्या एका माजी खासदाराचा व्हिडीओ प्रसारित झाला. त्याने अनेकांची आयुष्ये उद्ध्वस्त केली आहेत.
- राजकीय जीवनातील बदनामीमुळे राजकीय आयुष्य उद्ध्वस्त झाले, तर तो राजकारणाचा भाग आहे. परंतु एखाद्याचे खासगी आयुष्य उद्ध्वस्त होते, एखाद्याच्या कुटुंबावर प्रसंग येतो हा अनुभव आम्ही घेतला आहे. 'पार्टी विथ डिफरन्स' बोलणाऱ्या पक्षातील नेत्यांनाही मुलेबाळे आहेत. या मुलांना यंत्रणेसमोर उभे केले जाते तेव्हा यंत्रणेचे लोक वेगवेगळे घाणेरडे प्रश्न विचारतात. छगन भुजबळांनी अडीच वर्षे तुरुंगात घालविली आहेत. न्यायालयाने त्यांना निर्दोष सोडलं. मात्र, त्या अडीच वर्षांची भरपाई कोण करणार? असा सवाल त्यांनी केला.



शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाकडून मंगळवारी ठाण्यातील चिंतामणी चौक येथे किरीट सोमय्या यांच्याविरोधात संताप व्यक्त करीत जोडे मारो आंदोलन करण्यात आले. (छाया : विशाल हळदे)

### सीआयएसएफची सुरक्षा काढून घ्या : दानवे

महामंडळांवर विविध पदांचा प्रलोभने दाखवून, ईडी, सीबीआयसारख्या यंत्रणांची भीती दाखवून काही महिला अधिकाऱ्यांना धमकी देऊन त्यांची पिळवणूक व शोषण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला. अशा व्यक्तीला केंद्र सरकारने सीआयएसएफची सुरक्षा पुरविली आहे. याच सुरक्षेचा वापर शोषण करण्यासाठी होतो का? असे सांगताना त्यांनी सोमय्या यांची केंद्रीय सुरक्षा काढून घेण्याची मागणी केली.

### पीडित महिलेने तक्रार दाखल करण्यासाठी पुढे यावे : नीलम गोऱ्हे

सभागृहातील चर्चा संबंधित महिलेने ऐकली असेल तर तिने सभागृहावर विश्वास ठेवावा आणि तक्रारीसाठी पुढे यावे. याआधीही अशा महिला पुढे आल्या आहेत. यामुळे महिलांचा सभागृहावरील विश्वास दृढ होईल, असे आवाहन नीलम गोऱ्हे यांनी केले.

### भाजपने सोमय्यांची हकालपट्टी करावी : विद्या चव्हाण

दुसऱ्यांवर चिखल उडवणारे सोमय्या स्वत: चिखलात लोळतायेत. महिलांसोबत ते असे अश्लील प्रकार करत असतील तर त्यांना दुसऱ्यांवर बोलण्याचा अधिकार नाही. याची गृहमंत्र्यांनी चौकशी केली पाहिजे. भाजपने सोमय्यांची हकालपट्टी करावी.

दुसऱ्याचे वस्त्रहरण करणाऱ्याचे आज वस्त्रहरण झाले आहे.

\- नाना पटोले, प्रदेशाध्यक्ष, काँग्रेस

### उच्चस्तरीय यंत्रणांकडून चौकशी करणार का?

सोमय्या हे भ्रष्टाचारमुक्त भारत आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र बनवायला निघाले होते. छोट्या प्रकरणात ईडी, सीबीआयकडे जायचे, लोकांची घरे तोडण्यासाठी खांद्यावर हातोडा घेऊन जायचे. पण त्यांनी आता स्वत:ची चौकशी करण्यासाठी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहे. सोमय्यांच्या मागणीप्रमाणे त्यांची चौकशी ईडी, सीबीआय किंवा उच्चस्तरीत तपास यंत्रणांकडून करणार का?

\- भास्कर जाधव, आमदार

### किळसवाण्या सोमय्यांची चौकशी करा

वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून कितीही दबाव आणला गेला तरी भाजपमधले 'किळस'वाणे सोमय्या बाहेर येतच राहणार. भाजपने सोमय्या यांची पक्षातून हकालपट्टी करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची हिम्मत दाखवावी. अनेकांचे सार्वजनिक आयुष्य खोट्यानाट्या आरोपांनी पणाला लावणाऱ्या सोमय्यांनी स्वत:च या प्रकाराबद्दल खुलासा करण्याची गरज आहे.

\- यशोमती ठाकूर, काँग्रेस नेत्या

### यापुढे बरेच काही घडेल...

खासदार संजय राऊत यांनी एक ट्वीट केलं आहे. त्यात त्यांनी म्हटलं आहे की आमच्यावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे संस्कार आहेत. ते सांगायचे, जो आपल्या कर्माने मरणार आहे त्याला धर्माने मारू नका. आता नेमके तसेच घडत आहे. यापुढेदेखील बरंच काही घडणार आहे. जे जे होईल ते पाहत राहावे.